VOLUME No.68, ISSUE No.05, JANUARY-2020

ISSN (Online): 0474-9030

SDGS 2020

OUR HERITAGE

Impact Factor (2020): 6.8

UGC Care Listed, Multidisciplinary Journal for Research Publication

Special Issue on

# Sustainable Development Goals



Executive Editor

**Dr. Deepak M. Bharti**

Chief Editor

**Prin. Dr. Shivdas Z. Shirsath**

Copyright © Authors 2020

| | | | |
|---|---|---|---|
| | Hawaman badalachi karne va dushparinam ek abhyas | Prof. Dr. Akashe S. M. | |
| 239 | नागरी दारिद्र्य : कारणे आणि उपाय<br>Nagari Daridrya karane aani upay | श्रीमती धुमाळ सीमा काशिनाथराव<br>Smt. Dhumal Seema Kashinathrao | 1067-1069 |
| 240 | गरीबी नको<br>Garibi Nako | डॉ.घुटे बालाजी तुळशीराम<br>Dr. Ghute Balaji Tulshiram | 1070-1073 |
| 241 | शाश्वत विकास ध्येये आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>Shashwat vikas dhyeye aani bharatiya arthvyavastha | डॉ.ज्ञानेश्वर विष्णू गोरे<br>Dr. Dnyaneshwar Vishnu Gore | 1074-1079 |
| 242 | शाश्वत विकास आणि नोकरदार महिलांचा कौटुंबिक आणि नोकरीविषयक भूमिका संघर्ष : साहित्य पुनरावलोकन<br>Shashwat vikas ani nokardar mahilancha kotumbik aani nokari vishyak bhumika sangharsh : Sahitya punaravlokan | प्राचार्य डॉ.राम वाघ,<br>Principal Dr. Ram Wagh<br>गोविंद द.बावस्कर<br>Govind D. Bavaskar | 1080-1089 |
| 243 | स्वच्छता व आरोग्य<br>Swachhata va arogya | प्रा.आर.बी. काळे<br>Prof. R.B. Kale | 1090-1092 |
| 244 | भारतातील दारिद्र्य : कारणे व उपाय<br>Bharatatil daridrya : Karane va upay | डॉ.कल्याण आश्रु वरळे<br>Dr. Kalyan Aashru Warale | 1093-1096 |
| 245 | शाश्वत विकासात पायाभुत सुविधांची भूमिका : एक अभ्यास<br>Shashwat Vikasat payabhut suvidhanchi bhumika : Ek abhyas | डॉ.टकले दिनकर पी.,<br>Dr. Takle Dinkar P. ,<br>श्री.कावळे श्रीमंत तुकाराम<br>Shri. Kawle Shrimant Tukaram | 1097-1100 |
| 246 | शाश्वत विकासाचे उपाय<br>Shashwat Vikasache upay | डॉ.महेश प्रभाकरराव देशमुख<br>Dr. Mahesh Prabhkarrao Deshmukh | 1101-1105 |
| 247 | अंबेडकरी शाहिरी एक आकलन<br>Ambedkari Shahiri ek akalan | प्रा.डॉ.मनोहर सिरसाट<br>Prof. Dr. Manohar Sirsat | 1106-1108 |
| 248 | कृषी विकासात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची भूमिका<br>Krushi vikasat panlot kshetra vikas karyakramachi bhumika | डॉ.सी.एन.कोकाटे,<br>Dr. C.N. Kokate<br>कविश्वर एन.नलावडे<br>Kavishwar N. Nalawade | 1109-1113 |
| 249 | मुंबई उपनगरातील अनाथ मुलांच्या गरजा व समस्या<br>Mumbai Upnagaratil anath mulanchya garaja va samasya | प्रो.डॉ.पी.पी.लोखंडे,<br>Prof. Dr. P.P. Lokhande<br>मोहिनी नारायणराव नाब्दे<br>Mohini Narayanrao Nabde | 1114-1118 |
| 250 | मुंबई उपनगरातील अनाथ मुलांच्या शैक्षणिक गरजा व उपाय<br>Mumbai upnagaratil anath mulancha shaikshainik | प्रो.डॉ.पी.पी.लोखंडे,<br>Prof. Dr. P.P. Lokhande<br>मोहिनी नारायणराव नाब्दे | 1119-1122 |

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

# स्वच्छता व आरोग्य

प्रा. आर. बी. काळे
*समाजशास्त्र विभाग*
*र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई*
*Email: revannathbkale@gmail.com*

***संक्षिप्त गोषवारा (Abstract) :***

स्वच्छता व आरोग्य दोन्ही अभिन्न घटक आहे. दोन्ही घटकांचा प्रति काळजी घेतल्यास आपल्याला अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करण्याची आवश्यकता राहणार नाही. स्वच्छता हे आपल्या जीवन शैलीचा भाग आहे, ती वैयक्तिक स्वच्छता असो सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकाने स्वच्छतेबाबत जबाबदारीने वर्तन केल्यास स्वच्छते विषयक व त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या निश्चित कमी होतील.

**Keywords:** स्वच्छता, आरोग्य

**प्रस्तावना:**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले आहे की "स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षा महत्वपूर्ण आहे". या वरून आपल्याला स्वच्छतेचेमहत्व लक्षात घेता येऊ शकते. कोणत्याही देशाची ओळख त्या देशातील आरोग्य आणि स्वच्छतेचा स्तर कसा आहे त्यावर अवलंबून असतो. स्वच्छतेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आरोग्याशी आहे. निरोगी आरोग्य सदृढ देशाची निर्मिती करत असते. मानवाला रोगमुक्त राहण्यासाठी, पर्यावरण संतुलनासाठी स्वच्छता असणे आवश्यक आहे. प्रत्येक राष्ट्राच्या विकासामध्ये स्वच्छतेचे विशेष महत्त्व आहे. जिथे स्वच्छता तिथे चांगले आरोग्य.

**उद्देश:**

1. स्वच्छतेची व आरोग्याची संकल्पना समजून घेणे.
2. स्वच्छता आणि आरोग्याचा परस्परसंबंध अभ्यासने.
3. भारतातील स्वच्छता व आरोग्याची स्थिती जाणून घेणे.

**तथ्य संकलन :**

सदरील शोध निबंधामध्ये स्वच्छता हा घटक स्वतंत्र चल असून आरोग्य परतंत्र हा घटक चल आहे. प्रस्तुत अध्यानासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा

उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,मासिके,वर्तमानपत्र, इंटरनेट इ. वापर केला आहे.

**स्वच्छता आणि आरोग्याचा अर्थ:**

स्वच्छता:

स्वच्छता या शब्दाची उत्पत्ती ल्याटिन भाषेतील sanitas या शब्दापासून झालेली आहे, Sanitation अर्थात स्वच्छता असा होतो. ज्यामध्ये पिण्याचे पाणी, केरकचरा, सांडपाणी,मानवी मलमूत्र इ. प्रवृत्तीचा समावेश केल्या जातो.

“मानवनिर्मित तयार होणारा कचरा, सांडपाणी,मानवी मलमूत्रयांचा फेरवापर आणि त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे म्हणजे स्वच्छता होय.”

स्वच्छता ही एक व्यापक संकल्पना आहे. यात अनेक घटकांचा समावेश केला जातो. पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, शुद्ध पाणी,सौचालाय, प्रदूषण, संतुलित आहार इ. यासारख्या बाबींचा समावेश होतो. त्यामुळे स्वच्छता संपूर्ण समाजाला प्रभावित करत असतो.

**आरोग्य:**

“शारीरिक, मानसिक,समाजिक दृष्टीने व्यवस्थीत आणि रोगमुक्त अवस्था म्हणजेच आरोग्य होय.” जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने, “आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे.”

सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य : आरोग्यसंपन्न किंवा निरोगी पर्यावरणीय परिस्थती निर्माण करण्याची कृती म्हणजे सार्वजनिक स्वच्छता होय. सार्वजनिक आरोग्य म्हणजे समाजाच्या किंवा एकूण लोकसंख्येच्या आरोग्याची अवस्था होय. लोकांच्या आरोग्याचे रक्षण कारणे, तांची गुणवत्ता वाढविणे व ते सुधारणे यासाठी समाजाने केलेल्या प्रयत्नांना सार्वजनिक आरोग्य म्हणतात.

आरोग्य सर्व क्षेत्रात महत्त्वपूर्ण तत्व आहे. जोपर्यंत व्यक्तीचे आरोग्य निरोगी नसेल तर ती व्यक्ती समाजाच्या विकासात योगदान देऊ शकत नाही, आणि ती तेंव्हाच निरोगी राहील जेंव्हा त्याला सकस आह्राबरोबर शुद्ध पाणी स्वच्छ पर्यावरण प्राप्त होईल. आरोग्याचा अर्थ केवळ शारीरिक आजारापासून मुक्ती नसून पूर्णपणे बाह्य वातावरणाशी अनुकूल असणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या अभ्यासातून असे लक्षात आले आहे की, स्वच्छता मानवाच्या जीवनासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मानव जेंव्हा अस्वच्छ वातावरणात राहतो तेंव्हा त्यास अनेक आजार घेरतात. जवळपास 80% आजार अस्वच्छता आणि अस्वच्छ कारणामुळे होतात. त्यामुळे स्वच्छता आणि आरोग्यचा घनिष्ठसंबंध आहे. आजार हे अस्वच्छतेमुळे निर्माण होतात, ज्या ठिकाणी केर कचरा, मल-मुत्र सडते,त्या ठिकाणी डास तयार होऊन अनेक आजार निर्माण होतात, जसे की मलेरिया,

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

ताप, डेंगू, डायरिया, टीबी, इन्फेक्शन इ. हे सर्व आजार जडतात. वैक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता ठेवल्यास अश्या प्रकारची आरोग्याची हानी होणार नाही.म्हणजेच अस्वच्छता हा घटक आरोग्यावर परिणाम करत असल्याने त्यातून आपल्याला स्वच्छतेच्या सवयीमुळे बदल घडवून आणता येऊ शकतो.

"भारतातील जवळपास अर्ध्या 1.2 अब्जावधी लोकसंखेच्या घरात सौचालाय नाहीत." ग्रामीण भागातील 60% लोक एकतर सौचालय सुविधा उपलब्ध नाही." या वरून लक्षात घेता येऊ शकते की सौचालय नसल्यामुळे ही लोकसंख्या उघड्यावर सौचास जाऊन मलविसर्जन करतात, त्यामुळे तिथे दुर्गंधी पसरते, पर्यावरण सुद्धा प्रदूषित होते. त्यामुळे लहानबालकापासून ते वृद्ध लोकापर्यंत आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

स्वच्छतेच्या प्रति आपण आपल्या कर्तव्यापासून दूर जात आहोत. भारतीय समाजातील रूढी परंपरा पवित्र पद्धतीच्या नावाखाली ज्या नद्यांना आपण पवित्र मानतो त्या नद्यांमध्ये केरकचरा लागू नद्यांना प्रदूषित करत आहोत.त्यामुळे नदीचे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही परंतु ते पाणी आपल्याला प्यावे लागत असल्यामुळे त्यापासून किडनीचे आजार, दमा, त्वचारोग,डायरिया यासारखे आजार होऊन केवळ मानवी आरोग्य धोक्यात आले आहे असे नाही तर पर्यावरणातील इतर प्रजाती प्रभावित होऊन पर्यावरणाचा पर्यावरणीय समतोल धोक्यात येत आहे.

**सारांश:**

स्वच्छता व आरोग्य दोन्ही अभिन्न घटक आहे. दोन्ही घटकांचा प्रति काळजी घेतल्यास आपल्याला अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करण्याची आवश्यकता राहणार नाही. स्वच्छता हे आपल्या जीवन शैलीचा भाग आहे, ती वैयक्तिक स्वच्छता असो सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकाने स्वच्छतेबाबत जबाबदारीने वर्तन केल्यास स्वच्छते विषयक व त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या निश्चित कमी होतील.

**संदर्भ:**

[1] वाघेला, अनिल ,स्वच्छता का समाजशास्त्र, कल्पाज पब्लिकेशन, दिल्ली,2015.
[2] योजना ,जानेवारी 2015.
[3] शुक्ल, अरविंद, स्वच्छ भारत अभियान बुक पब्लिकेशन ,लखनऊ 2016.
[4] कुरुक्षेत्र, ऑक्टोंबर 2017.
**[5] mr.wikipedia.org.**
**[6] vishwakosh.marathi.gov.in.**
**[7] vikaspedia.in/health/sanitation-and-hygiene/sanitation.**